# ऋण निर्देश

प्रस्तुत शोधप्रबंध सादर करताना मला कर्तव्यपूर्तीचे समाधान होत आहे. या शोध प्रबंधासाठी डॉ. रामचंद्र भालचंद्र देवस्थळी, प्रपाठक आणि विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, यांनी सातत्याने अमूल्य मार्गदर्शन केलेले आहे. प्रस्तुत प्रबंधाच्या संदर्भात त्यांचा लाभलेला सहवास माझ्या वृत्ती प्रवृतींनाही विशिष्ट वळण देऊन गेला आहे. प्रस्तुत शोधप्रबंधातून मार्गदर्शन, सहकार्य, प्रेरणा देणाऱ्या आणि मानवी जीवन मूल्यांचे साक्षात अधिष्ठान बनून राहिलेल्या डॉ. देवस्थळी यांचा मी सदैव ऋणी आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य, माननीय विश्वास सायनाकर यांचे आशिर्वाद प्रस्तुत शोधप्रबंधाच्या परिपूर्तीपाठीमागे उभे आहेत त्यांचाही मी सदैव ऋणी आहे.

वाळवा तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक, तसेच इयत्ता १ ली ते ४ थी ला अध्यापन करणाऱ्या सर्व अध्यापकांनी प्रस्तुत शोधप्रबंधाची प्रश्नावली भरून देण्यामध्ये मोलाचे सहकार्य केले. मी त्यांचा ऋणानिर्देश करणे माझे कर्तव्य समजतो.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या कार्यामध्ये आमच्या कॉलेजमधील बी.ए.भाग १ व २ मधील शिक्षणशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थी आणि माझे सहकारी प्रा. दिलीप पाटील, प्रा. सर्जेराव गायकवाड यांचाही मी आभारी आहे.

तसेच कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे सहाय्यक ग्रंथपाल श्री. विजय तिबिले यांनी आवश्यक त्या संदर्भ ग्रंथाची वेळोवेळी पुर्तता करून सहकार्य केले याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY. KOLHAPUR

माझ्या संशोधन कार्याला माझ्या माता पित्यांना आणि पत्नी सौ. भारती यांनी दिलेल्या सक्रिय प्रोत्साहनाबद्दल आणि याहूनही "ज्या कोणी" माझ्या संशोधन कार्याला अव्यक्त असे सुयश चिंतीले असेल त्या सर्व ज्ञात अज्ञातांचा मी ऋणी आहे.

केटाळा न करता सुबक टंकलेखन करुन देणाऱ्या सौ. शारदा शेळके(चैतन्य कॉम्प्युटर सर्व्हिसेस, इस्लामपूर) यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

या शोधप्रबंधाचा प्राथमिक स्तरावरील मराठी अध्यापनाचा मूल्यसंक्रमण संदर्भात स्तर उंचावण्यास निश्चितपणे चांगला उपयोग होईल अशा विश्वास वाटतो.

(जयवंत श्रीरंग पाटरपट्टे)

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : 30/05/94